# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ७०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/१०/२०१६

**१) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/१०/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादी यांची अल्पवयीन बहीन ही शाळेत जाते म्हणुन आईला सांगुन घरुन निघुन गेली परंतु ती सायकांळ पर्यत घरी परत न आल्याने तिचा शोध नातेवाहीकामध्ये घेतला असता मिळुन आली नाही तीला यातील संशयीत आरोपीने पळवुन नेले असावे असा संशय दर्शविल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २३/१०/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे घराशेजारी राहत असुन यातील आरोपी क्र. १ ने आपल्या गल्लीत धानाचे तनस जाळले असता त्याचा धुर फिर्यादीचे घरात गेल्याने फिर्यादीच्या मुलाने जळत्या तनसीवर पाणी टाकुण विझविल्याने यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत व भांडण करुन फिर्यादीचे घरा समोरील रस्त्यावर फिर्यादीचा हात पकडुन ओढतांन करुन जमलेल्या लोकासमोर तिचेशी अश्लिल कृत्य करुन फिर्यादीला लज्जा निर्माण केली व अश्लिल शब्दात शिविगाळ केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,२९४,३२३,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) आमरोडवर लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/१०/२०१६ रोजी १४.४५ वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील ऑटो रिक्षा गाडी क्र. एमएच ३६/३६१८ चा चालकाने सार्वजनिक ठिकानी आमरोडवर येना–या जाना–या लोकांच्या जिवितास धोका व वाहतुकीस अळथळा होईल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. ढोक यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखांदुर येथे कलम २८३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. ढोक पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.